वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/50939-L/230/RNP/Beed/2025-27 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-सोमवार दि. ३० जून २०२५ पाने ४ किंमत ३

# धनंजय मुंडे अज्ञातवासातून परतले

## धनंजय मुंडेंच्या खळबळजनक आरोपावर संदीप क्षीरसागरांचा पलटवार

Email:- dailydivyawarta@Gmail.com
दिव्य वार्ता
Email:-editordivyawarta@gmail.com

## मी काही त्यांच्यासारखे १५० दिवस पळून गेलो नाही-आ.क्षीरसागर



बीडच्या एका खाजगी कोचिंग क्लासेसमध्ये 'नीट' ची तयारी करणाऱ्या एका १७ वर्षीय मुलीची छेडछाड आणि लैंगिक छळ प्रकरणाने मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणात पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल झालेला आरोपी विजय पवार हा आमदार संदीप क्षीरसागर यांचा निकटवर्तीय आहे. त्यामुळेच विजय पवारला आमदार क्षीरसागर यांनी बीडच्या शिवजयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष केले होते. विजय पवारविरुद्ध गुन्हा दाखल झाला, त्याच रात्री तो आमदार संदीप क्षीरसागर यांच्यासोबत होता. पुढच्या दोन दिवसात पीडितेच्या वडिलांना २० फोन करण्यात आले, असा थेट आरोप राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते आणि माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी केला. आता धनंजय मुंडे यांच्या आरोपावर संदीप क्षीरसागर यांनी प्रत्युत्तर दिले आहे.

संदीप क्षीरसागर म्हणाले की, त्यांची मागणी एसआयटीची आहे, त्जो प्रकार घडला तो चुकीचा घडला आहे. गुन्हा दाखल झाला त्याच्या दुसऱ्या दिवशीच त्या शिक्षकांना अटक झाली आहे. प्रशासनासोबत आम्ही चर्चा करतोय, पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतले आहे. ते माझ्या जवळचे असले तरी ॲक्शन घ्यायला मागे पुढे

▶▶ पान २ वर

## बीड लैंगिक शोषण प्रकरणाची एसआयटी चौकशी महिला आयपीएस अधिकाऱ्याच्या नेतृत्वात होणार तपास

बीड , (दिव्य न्युज ):- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी बीड येथील एका कोचिंग क्लासेसमध्ये अल्पवयीन मुलीच्या झालेल्या लैंगिक शोषणाची एसआयटी चौकशी करण्याची घोषणा केली. प्रस्तुत प्रकरणाची संभाव्य व्याप्ती तथा संवेदनशीलता लक्षात घेऊन सरकारने या प्रकरणाची एसआयटी चौकशी करण्याचा निर्णय घेईल. एका वरिष्ठ दर्जाच्या महिला आयपीएस अधिकाऱ्याच्या नेतृत्वात ही समिती कालबद्धपणे आपला तपास करून या गुन्ह्याचा छडा लावेल. या प्रकरणी कुणालाही पाठिशी न घालता पीडित मुलींना न्याय देण्यात येईल, असे ते म्हणालेत.

भाजप सदस्य चेतन तुपे यांनी बीडमधील लैंगिक शोषणाचा मुद्दा सभागृहात उपस्थित केला. गुरू-शिष्याच्या नात्याला काळीमा फासणारे कृत्य या महाराष्ट्रात घडले आहे. बीडमधील एका कोचिंग क्लासेसमध्ये एका अल्पवयीन मुलीचे लैंगिक शोषण झाले आहे. सध्या या प्रकरणातील दोन्ही आरोपींना अटक झाली आहे. त्यांच्यावर पोस्कोचा गुन्हाही दाखल करण्यात आला. पण या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची गरज

▶▶ पान २ वर

## बीड प्रकरणात एसआयटी स्थापन

बीड,(दिव्य न्युज)शहरातील एका खासगी कोचिंग क्लासेसमध्ये नीटची तयारी करत असलेल्या सतरा वर्षीय अल्पवयीन विद्यार्थीनीशी अश्लील वर्तन केल्याचा प्रकार घडला. याप्रकरणी नराधम विजय पवार आणि प्रशांत खाटोकर पोलीस कोठडीत आहे. दरम्यान या घटनेने संपूर्ण बीड जिल्हा आणि महाराष्ट्रात खळबळ उडाली. त्यानंतर आज विधानसभा सभागृहात या मुद्दा उपस्थित झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महिला आयपीएस अधिकाऱ्याच्या अध्यक्षेतखाली एसआयटी स्थापन करून टाइमबाँड पद्धतीने तपास करण्याची घोषणा केली. गुरु-शिष्याच्या नात्याला काळिमा फासणाऱ्या या घटनेबद्दल पालकांमध्ये आणि सर्वसामान्यांमध्ये संताप आहे. विधीमंडळात या विषयावर हडपसरचे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार चेतन तुपे यांनी महिला आयपीएस अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली एसआयटी स्थापन करून चौकशी करावी, अशी मागणी केली. यावर उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी

▶▶ पान २ वर

## माणुसकीला काळीमा फासणाऱ्या आरोपी बद्दल आदराची भाषा बोलुन आ.संदिप क्षीरसागरांनी गुन्हेगारांना पाठबळ दिले-अशफाक इनामदार व बरकत पठाण

बीड (दिव्य न्युज):- एका गरीब कुटुंबातील मुलगी आपले भविष्य उज्वल करण्यासाठी अल्प वयात शिक्षणाची पायरी चढुन उमाकिरण येथे शिकवणी वर्ग चालवणऱ्या शिक्षणक्षेत्राला बदनाम कुन माणुसकीला काळीमा फासणाऱ्या प्रा. विजय पवार व प्रा. खटावकर यांनी अल्पवयीन मुली बरोबर तिच्या गरीबी परिस्थितीचा फायदा घेऊन तिच्या बरोबर



जे निच कृत्य केले ही घटना बीड शहरात घडुन आठवडा उलटुन गेला आहे. या प्रकरणात मुग गिळून गप्प बसलेले आ. संदिप क्षीरसागर यांनी तोंड उघडुन आरोपी विजय पवार बद्दल सर या शब्दाचा वापर करुन शिक्षण क्षेत्राला काळीमा फासणा-या आरोपी बद्दल एक प्रकारचे पाठबळच दिले आहे. आमदाराचा आरोपी बद्दल आदर लक्षात घेता या प्रकरणाची सखोल चौकशी करुन पिडीतेला न्याय द्यावा अशी मागणी

▶▶ पान २ वर

## परभणी जिल्हाचा विकास न झाल्यामुळे अनेक युवकांना दुसऱ्या राज्यात जावून नौकऱ्या व कामे करावी लागत आहे

### खा.असदुद्दीन औवसी यांचे प्रतिवादन



परभणी, (दिव्य न्युज):- परभणी जिल्हयाचा अजूनही विकास न झाल्याने रोजगारासाठी युवकांना पुणे, हैद्राबाद येथे जावे लागते. परिणामी आई - वडिल व घरदार सोडून कामानिमित्त परगावी राहण्याची वेळ परभणी जिल्हयातील नागरीकांवर आली आहे, असे प्रतिपादन ऑल इंडिया मजलिस - ए-

▶▶ पान २ वर

## सय्यद खाजा यांना डॉक्टरेट प्रदान

### इंग्रजी विषयात मिळवली पीएचडी ;सर्व स्तरातून अभिनंदन



बीड (दिव्य न्युज):- येथील सय्यद खाजा बॉस यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत डॉक्टरेट पदवी प्राप्त केली आहे. इंग्रजी विषयातुन त्यांनी शशी थरूर यांच्या कादंबऱ्या हा विषय घेऊन सादर केलेला प्रबंध स्विकारून विद्यापीठाने सय्यद खाजा यांना पीएचडी पदवी प्रदान केली आहे. डॉक्टरेट मिळाल्याबद्दल सय्यद खाजा यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे. बीड येथील समाजसेवक सय्यद खाजा यांनी सादर केलेला शशी थरूरच्या निवडलेल्या कादंबऱ्यांमध्ये व्यंग हा प्रबंध या विद्यापीठाने मानविकी विद्याशाखेअंतर्गत इंग्रजी विषयातील पीएच.डी. पदवी प्रदान करण्यासाठी स्वीकारला आहे. जो यूजीसी (पीएच.डी. पदवी प्रदान करण्यासाठी किमान मानक आणि प्रक्रिया) नियमन २०१६ नुसार आहे. त्यानुसार सय्यद खाजा यांना सदर पदवी प्रदान करण्यासाठी पात्र घोषित करण्यात आल्याचे पत्र विद्यापीठाने दिले आहे. सय्यद खाजा यांनी डॉ. रमेश ए. लांडगे, संशोधन मार्गदर्शक, इंग्रजी विभाग, कालिकादेवी कॉलेज, शिरूर कासार ( जि. बीड ) यांच्या मार्गदर्शनाखाली प्रबंध सादर केला. सय्यद खाजा यांनी पीएचडी पदवी प्राप्त केल्याबद्दल त्यांचे सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व सांस्कृतिक स्तरातून अभिनंदन होत असून पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात येत आहेत.

## हैद्राबादचे वादग्रस्त आमदार याचा भाजपाला रामराम

### मी हिंदूसाठी काम करत आहे आणि काम करत राहिल

हैदराबाद, (वृत्तसेवा):- तेलंगणातील भाजपचे आमदार टी. राजा सिंह ऊर्फ टायगर राजा यांनी पक्षाकडे राजीनामा पाठवला आहे. आपल्या वादग्रस्त विधानांमुळे राजा सातत्यानं चर्चेत असतात. ते गोशामहालचे तीन टर्मचे आमदार आहेत. राज्यातील नेतृत्त्वाशी असलेल्या वादामुळे राजा यांनी पक्ष सोडत असल्याची घोषणा केली. राजा सिंह यांनी त्यांचा राजीनाम्याचं पत्र सोशल मीडियावर शेअर केलं आहे.



'गप्प राहण्याला अनेकांनी सहमती समजू नये. मी केवळ माझ्यासाठी नव्हे, तर असंख्य कार्यकर्ते आणि मतदारांच्या वतीनं बोलत आहे. कार्यकर्ते आणि मतदार आपल्या पाठिशी, आपल्यासाठी पूर्ण विश्वासानं उभे राहिले. आज त्यांच्या पदरी निराशा पडली आहे. जय श्रीराम,' असं राजा सिंह यांनी राजीनामा देताना म्हटलं आहे.

गोशामहाल विधानसभा मतदारसंघाचं सलग तिसऱ्यांदा प्रतिनिधीत्व करत असलेल्या राजा यांनी काही दिवसांपूर्वीच एक व्हिडीओ मेसेज शेअर केला होता. त्यातून त्यांनी पक्ष नेतृत्त्वाकडे आपल्याला प्रदेशाध्यक्षपद देण्याचं आवाहन केलं होतं. आपल्याला प्रदेशाध्यक्ष मिळावं अशी असंख्य कार्यकर्त्यांची इच्छा आहे. त्यासाठी अनेकांनी फोन केले. मला पक्ष नेतृत्त्वानं संधी द्यावी, असं राजा सिंह म्हणाले होते.प्रदेशाध्यपदावर नियुक्त झाल्यावर आपण काय करणार, याची संपूर्ण रुपरेखा राजा सिंह यांनी मांडली होती. पक्षात एक गोरक्षा आघाडी स्थापन करुन आणि गोरक्षेसाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी ढाल म्हणून उभे राहू. भाजपचा संदेश घरोघरी पोहोचवण्याचा संकल्प हाती घेऊ आणि पक्षाची ओळख एक हिंदुत्त्ववादी

▶▶ पान २ वर













# 'नीट' मार्गावर चालताना ..!

काही दिवसांपूर्वी बीड शहरातील उमाकिरण एज्युकेशन हब ला सील लावण्यात आल्याने तेथे प्रवेश घेतलेल्या नीट च्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे काय? सील उघडेपर्यंत तेथील विद्यार्थ्यांना ज्ञानदान कोण करणार? येथील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची जबाबदारी घेण्यासाठी एखादे महाविद्यालय किंवा शिक्षण विभाग पुढे येईल का? तेथे घडलेल्या प्रकरणाचा तपास जलद गतीने होईल का? विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित पाहून या प्रकरणाचा सोक्षमोक्ष लवकर लावण्यासाठी जलद गती न्यायालयात हे प्रकरण चालविले जाईल का? आरोप असलेले तेथील दोन्ही प्राध्यापक दोषी आढळले तर त्यांना न्यायालयात कोणती शिक्षा होईल? असे एक ना अनेक प्रश्न विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांच्या मनात उभे ठाकले आहेत.

उमाकिरण सारखे व्यावसायिक खाजगी शैक्षणिक हब का उभे राहिले?

जेव्हापासून शासनाने डॉक्टरकीचे शिक्षण घेण्याकरिता नीट परीक्षा उत्तम गुणाने उत्तीर्ण होणे अनिवार्य केले, तेव्हापासून उमाकिरण आणि त्यासारखे अनेक व्यावसायिक खाजगी शैक्षणिक हब उभे राहिले. अशाप्रकारे पैसे घेऊन शिक्षण विकणाऱ्या खाजगी शैक्षणिक हब वाल्यांनी सुरुवातीला पालकांना परवडेल असे दर लावून आपापल्या शिकवण्या सुरू केल्या, परंतु जसजसे दिवस पुढे गेले तसतसे असे हब चालविणाऱ्या धुरीनांनी हळूहळू अव्वाच्या सव्वा रक्कम आकारून ती पालकांकडून वसूल करण्यास सुरुवात केली. म्हणून आर्थिक दृष्ट्या असे खाजगी शैक्षणिक हब चालविणारे गब्बर होत गेले. त्यांचा आर्थिक पाया नव्हे तर इमारती एवढ्या मजबूत आणि उंच झाल्या की ते कोणत्या ना कोणत्या राजकीय पक्षाच्या नेत्यांना जवळ करून समाजात आपली प्रतिष्ठा वाढवू लागले. एवढेच नव्हे तर राजकारण्यांना निवडणुकीत आर्थिक रसद पुरवित असल्याचेही म्हटले जात आहे. शिवाय अनेक पक्षांच्या मोठमोठ्या नेत्यांच्या प्रचंड मोठमोठ्या सभेमध्ये संपूर्ण सभेच्या सूत्रसंचालनाचे काम देखील मोठ्या नेत्यांच्या व्यासपीठावरून यातील काही प्राध्यापक करू लागले होते. या सर्व कारणांमुळे यांच्या खाजगी शैक्षणिक हब मध्ये नेमके काय चालले आहे? कसे चालले आहे? यांच्याकडे पारंगत प्राध्यापक आहेत का? जे प्राध्यापक आहेत त्यांची पार्श्वभूमी कशी आहे? ते येथे येण्या अगोदर काय करत होते? त्यांचे शैक्षणिक योगदान कसे व किती आहे? ते विद्यार्थ्यांना ज्ञानदान करण्याच्या लायकीचे आहेत की नाही? येथे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना किती फी आकारावी? वगैरे प्रश्नांकडे ना शिक्षण विभागाने, ना प्रशासनाने ना शासनाने लक्ष दिले. यामुळे आर्थिक दृष्ट्या मातब्बर आणि गब्बर झालेले खाजगी शैक्षणिक हब च्या काही संचालकांना माज सुद्धा चढला. यामुळे ते कुणालाही जुमानीनासे झाले. याचाच परिपाक म्हणून फक्त घसघशीत रक्कम घेऊन येणारे विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनाच असे खाजगी शैक्षणिक हब चालविणारे प्रवेश देऊ लागले. यांच्याकडे घाम गाळून नाममात्र दाम मिळविणाऱ्या पालकांची मुले-मुली शोधूनही सापडत नाहीत. त्यामागचे कारण हेच आहे. गडगंज मालमत्ता असणाऱ्या पालकांकडून मनमानी प्रमाणे पैसे उकडून कमी वेळेत आणि कमी श्रमात या खाजगी शैक्षणिक हब वाल्यांनी बक्कळ माया जमविली. मात्र अशाप्रकारे जवळ आलेला पैसा यांचे मन-मस्तिष्क खराब करून गेला. हे उमाकिरण चा सर्वेसर्वा असलेला प्राध्यापक विजय पवार आणि त्याचा सहप्राध्यापक खाटोकर यांनी अल्पवयीन विद्यार्थिनी सोबत केलेल्या गैरकृत्याची तक्रार जेव्हा पीडित विद्यार्थिनीने आपल्या पालकांसोबत शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे दिली, त्यानंतर पोक्सो कायद्या अंतर्गत गुन्हा नोंद झाल्याने समाजासमोर आले. आणि याची सर्व दूर जाहीर वाच्यता मोठ्या प्रमाणात झाली. अनेक सामाजिक संघटनांनी या घटनेत दोषी असलेल्यांना कडक शासन झाले पाहिजे अशी मागणी लावून धरली आहे. यापुढे आता विजय पवार आणि खाटोकर यांचे पोलीस कारवाई आणि न्यायालयीन प्रक्रियेनंतर काय होईल ते होईल परंतु ज्या अल्पवयीन विद्यार्थिनीमुळे हे प्रकरण समोर आले, तिचे पुढे काय होईल? या विद्यार्थिनी शिवाय अजूनही अन्य कोणत्या विद्यार्थिनींवर या खाजगी शैक्षणिक हब मध्ये अशाप्रकारे अनैतिक कृत्य घडले आहे काय? प्रत्येक विषयासाठी हजारो रुपये भरून या खाजगी शैक्षणिक हब मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे काय? या प्रश्नाने विद्यार्थ्यांसह पालकांचीही झोप उडाली आहे. येथील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकरिता आता कोणते एखादे महाविद्यालय किंवा शिक्षण विभाग पुढे येतो का? हे पाहणे म्हणजे या दोघांची परीक्षा घेण्यासारखेच आहे. या परीक्षेसाठी या दोन्ही पैकी कोण बसतोय? बसल्यास पास होणार का? हे पाहणेही औत्सुक्याचे ठरणार आहे.

ही समाजातील खूप मोठी शोकांतिका!



खाजगी शैक्षणिक हब मधील शिक्षक जिथे एक-एका विषयाला वर्षाकाठी हजारो रुपये आकारून शिकवतात. तेच शिक्षण प्रत्येक महाविद्यालयातील दरमहा प्रत्येकी दोन ते तीन लाख रुपये वेतन घेणारे प्राध्यापक का शिकवू शकत नाही? असा प्रश्न ना कधी शिक्षण विभागाला पडतो, ना प्रशासनाला, ना शासनाला आणि सरते शेवटी पालक व विद्यार्थ्यांना सुद्धा. ही समाजातील खूप मोठी शोकांतिका आहे.

नीट च्य वेडापायी

जेव्हापासून नीट नावाचे खुळ पालक आणि विद्यार्थ्यांच्या डोक्यात फिट बसविण्यात आले तेव्हापासून या नीट मुळे अनेक विद्यार्थी आणि विद्यार्थिनी एक दोन नव्हे तर चार-चार आणि पाच-पाच वेळा याची परीक्षा देत आहेत. यामुळे त्यांचे वय वाढत जाते, ते डिप्रेशन मध्ये जातात. त्यांचे पालक सुद्धा डिप्रेशन मध्ये जातात. लाखोंचा खर्चही होतो आणि कमी गुण घेणारे विद्यार्थी व विद्यार्थिनी डॉक्टर सुद्धा होत नाही आणि नीट च्या नादी लागले म्हणून फिजिक्स, केमिस्ट्री आणि बायोलॉजी शिवाय अन्य विषयात विद्यार्थी कच्चे राहतात. म्हणून ते इतर क्षेत्रात सुद्धा अपयशी ठरतात. अनेक विद्यार्थी नीट मध्ये कमी गुण मिळाले किंवा नापास झाले म्हणून आत्महत्या सुद्धा करतात. एवढेच नाहीतर काही दिवसांपूर्वीच एका शिक्षकाच्या मुलीने नीट मध्ये कमी गुण घेतल्याने त्या शिक्षक पित्याने पोटच्या मुलीला एवढी बेदरकारपणे मारहाण केली की त्यात तिचा जीव गेला ही घटना ताजी आहे. याशिवाय अनेक घटना अशा आहेत, ज्या निव्वळ आणि निव्वळ नीट पायी घडलेल्या आहेत.

नीटची किटकिट बंद व्हायलाच हवी

नीट येण्याअगोदर विद्यार्थी आणि विद्यार्थिनी उच्च शिक्षण घेऊन डॉक्टर होत नव्हते का? तर या प्रश्नाचे उत्तर आहे होत होते. उलट पूर्वीचे एमबीबीएस डॉक्टर हे रुग्णाची नाडी, डोळे आणि जिभेचा रंग पाहून रुग्णाला नेमका कोणता रोग झालाय हे ओळखून उपचार करायचे. परंतु आज नीट सारख्या फालतू आणि भंकस परीक्षा देऊन एम.डी., एम.एस., गायनाकॉलॉजिस्ट वगैरे सारख्या डिग्र्या मिळवून डॉक्टर झालेले, रुग्ण आल्यानंतर त्याच्या रक्त लघवी आणि अन्य इतर भरमसाठ तपासण्यात केल्याशिवाय रुग्णाला नेमका कोणता रोग झाला, याचे निदान करत नाहीत किंवा उपचारही देत नाही. सर्व तपासण्या झाल्यानंतरच रुग्णांवर उपचार करतात. मग असे कुचकामी डॉक्टर तयार करणारी नीट परीक्षा हवीच कशाला? या नीटची किटकिट कायमस्वरूपी बंद व्हायलाच हवी.

नीट खाजगी यंत्रणेकडून घेण्यात येणारी परीक्षा

नीट परीक्षेविषयी विचार केला तर हसावे कि रडावे हेच कळत नाही. कारण ही परीक्षा काही शासनाकडून घेण्यात येत नाही. जसे शासनाकडून यूपीएससी, एमपीएससी या परीक्षा घेण्यात येतात. त्यांचा आपला एक विशेष दर्जा असतो, तसे या नीट परीक्षेचे नाही. ही परीक्षा घेण्याचा अधिकार भलेही शासनाने दिला असला तरी ही परीक्षा मात्र खाजगी यंत्रणेकडून घेण्यात येते आणि खाजगी यंत्रणा म्हणजे त्यात किती सत्यता आणि किती असत्य असते हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

नीट च्या परीक्षेत चालले काय?

काही वर्षांपूर्वी बीड शहरातच नीट मध्ये चांगले गुण घेऊन उत्तीर्ण झालेल्या काही विद्यार्थ्यांचे व ते शिकत असलेल्या खाजगी शैक्षणिक हब चालकांचे पितळ उघडे पडले होते. ज्यात या खाजगी शिक्षकांनी अक्षरश: एकेका विद्यार्थ्यासाठी लाखो रुपयांची उधळपट्टी करून विद्यार्थ्यांना उत्तमोत्तम गुण मिळवून उत्तीर्ण केल्याचे समोर आले होते. एवढे मोठे प्रकरण गाजून देखील आपल्या मुला-मुलींसाठी आंधळे होऊन व बुद्धी गहाण ठेवून बसलेल्या गडगंज पैसा असलेल्या पालकांच्या डोक्यात व डोळ्यांमध्ये प्रकाश पडला नाही. आता उमाकिरण मध्ये घडलेल्या या घटनेनंतर तरी प्रकाश पडेल, अशी आशा करायला हरकत नाही.

**लेखन – एस.एम.युसूफ़**
**(मुक्तपत्रकार)**
आसेफ़नगर, बीड
संपर्क – ९०२१ ०२ ३१२१

---

पान १ वरून

## धनंजय मुंडे

बघू नका, असं मी सांगितलं आहे. या प्रकरणात गुन्हा दाखल करायला १० दिवस लागले नाही. माझ्या जवळचे असले तरी पीडिताने तक्रार देताच गुन्हा दाखल झाला आहे. मी काही त्यांच्यासारखं १५० दिवस पळून गेलो नाही. त्यांचे मंत्रीपद गेल्याने त्यांना दुःख आहे. ते या प्रकरणात बोलताय तसेच मस्साजोग प्रकरणी त्यांनी आक्रमक भूमिका घ्यायला हवी होती. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा आहेत. त्यांनी त्यांच्यावर विश्वास ठेवायला हवा होता, असे त्यांनी म्हटले आहे.

संदीप क्षीरसागर पुढे म्हणाले की, या प्रकरणात पोलीस देखील तत्परतेने कारवाई करत आहेत. मी आता बोलण्यापेक्षा सत्तेत मुंडे साहेब आहेत, त्यांनी जोर लावला पाहिजे. मस्साजोग प्रकरणी मुंडे बोलले की, १५० दिवस बाहेर राहावं लागलं, त्यांचे मंत्रीपद गेलंय, त्यामुळे त्यांना दुःख आहे. मात्र, लोकप्रतिनिधी रोज रस्त्यावर काम करतो. चहाच्या टपरीवर मी जातो, तिथे लोकं येतात, भेटतात. संबंधित लोक माझ्या ओळखीचे आहेत. पीडितेकडे मी जाणार होतो. मात्र, आताच जाणं योग्य नाही, त्यामुळे तिथे गेलो नाही, असे त्यांनी यावेळी सांगितले.

## बीड लैंगिक शोषण

आहे. सरकारने या प्रकरणी एसआयटी चौकशी करावी, अशी मागणी त्यांनी केली होती. त्यांच्या या मागणीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एसआयटी चौकशीची घोषणा केली.

ुख्यमंत्री विधानसभेत बोलताना म्हणाले की, सभागृहाचे सदस्य चेतन तुपे यांनी बीडमध्ये घडलेल्या एका अतिशय गंभीर घटनेचा मुद्दा उपस्थित केला. कोचिंग क्लासेसला येणाऱ्या मुलींचे लैंगिक शोषण करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. त्यातील एका पीडित मुलीने व तिच्या आईने हिंमतीने या प्रकरणात गुन्हा दाखल केला. त्यानंतर या प्रकरणाची वस्तुस्थिती बाहेर आली. या अंतर्गत पोस्को कायद्यांतर्गतही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सन्माननीय सदस्याने या प्रकरणी काही मुद्दे उपस्थित केलेत. या प्रकरणी आरोपींची दोनच दिवसांची कोठडी का मागण्यात आली? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. याची चौकशी केली जाईल. या प्रकरणी बीडसह संपूर्ण राज्यात रोष पसरला आहे. कारण, या प्रकरणाची व्याप्ती अधिकची असू शकते. एक मुलगी हिंमतीने पुढे आली, पण ही घटना अनेक मुलींसोबत घडल्याचा संशय आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची व्याप्ती व संवेदनशीलता लक्षात घेऊन सरकारने या प्रकरणाची वरिष्ठ दर्जाच्या आयपीएस महिला अधिकाऱ्याच्या नेतृत्वात एक एसआयटी चौकशी स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. एसआयटीच्या माध्यमातून या गुन्ह्याचा तपास केला जाईल.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, या प्रकरणाची व्याप्ती कुठपर्यंत आहे? कुणाचा वरदहस्त आहे का? याला राजकीयदृष्ट्या, सामाजिकदृष्ट्या वेगवेगळे वळण देण्याचा प्रयत्न केला जात आहे का? आदी तपास या प्रकरणी केला जाईल. त्यातून पीडित मुलींना योग्य न्याय मिळवून देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. त्यामुळे मी सभागृहाला व सदस्यांना ग्वाही देतो की, या प्रकरणातील एसआयटी कालबद्ध तपास करून या गुन्ह्याचा छडा लावेल. पीडित मुलींना न्याय देईल. तसेच अशा प्रकारच्या नराधमांना कठोर शिक्षा मिळेल. एवढेच नाही तर त्यांना वाचवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांनाही शिक्षा मिळेल अशी व्यवस्था केली जाईल, असे मुख्यमंत्री म्हणाले.

दुसरीकडे, या प्रकरणातील पीडित मुलीने बालकल्याण समितीपुढे आपल्यावरील आपबीती कथन केली आहे. ती म्हणाली, शिक्षक खाटोकरने मला केबिनमध्ये बोलावून बॅड टच केला. त्यामुळे मी प्रतिकार केला,त्याला लाथा-बुक्क्यांनी मारले. पण तो ऐकत नव्हता. त्याने मला कपडे काढायला लावले, माझे फोटोही काढले. सहनशीलतेचा अंत झाला म्हणून मी पोलिसांत तक्रार दिली. त्याला अद्दल घडली पाहिजे. पोटच्या मुलीचा झालेला हा छळ ऐकून तिचे आई, वडिलही धाय मोकलून रडले.

सोमवारी पीडीतेला बालकल्याण समितीसमोर हजर करण्यात आले. यावेळी तिने समितीसमोर सगळा घटनाक्रम उलगडला. खाटोकर याने तिला सर्वाधिक त्रास दिला. वर्गातही इतर विद्यार्थ्यांसमोर त्याचे माझ्याशी वागणे चांगले नव्हते. हिने मला एक प्रश्न विचारला आहे त्याचे उत्तर मी देणार आहे असे म्हणून तो क्लास संपल्यानंतर केबिनमध्ये बोलावत होता. तो ऐकत नव्हता, तर विजय पवारने हाच प्रकार केल्याचे पीडीता म्हणाली.

बालकल्याण समितीने पीडीतेची स्थिती पाहून तिला एक महिला सहायक दिली आहे. तिचे समुपदेशन करुन धक्क्यातून बाहेर पडण्यास मदत करणे, करिअरच्या दृष्टीने मदत करणे, आत्मविश्वास उंचावणे, कायदेशीर मदत ही कामे महिला सहायक करेल. या निर्णयामुळे पीडीतेला मदत होईल.

## माणुसकीला काळीमा फासणाऱ्या

नगरसेवक अशफाक इनामदार यांनी बीड जिल्हा पोलिस अधिक्षक यांचेकडे केली आहे.

पोलिस अधिक्षक साहेब, बीड यांना दिलेल्या निवेदनामध्ये पुढे असे म्हटले आहे की, बीड शहरात उमाकिरण या ठिकाणी घडलेली घटना ही निंदनीय असुन आरोपीला कडक शासन करावे अशी मागणी सर्व स्तरातुन होत आहे. कारण कोचींग क्लासेस संस्था चालक मुख्य आरोपी असलेले विजय पवार हे विद्यमान आमदार यांचे खंदे समर्थक असुन विधानसभा निवडणुकीमध्ये आर्थिक व्यवहार हाताळण्याची संपुर्ण जबाबदारी आरोपी विजय पवार यांच्यावर होती. म्हणुन आरोपी विजय पवार यांनी आमदार पाठीशी असल्यामुळे असे गैरकृत्य करण्याचे धाडस केलेले आहे. या प्रकरणावर आठ दिवसापासुन मुग गिळून गप्प बसलेले आ. संदिप क्षीरसागर हे पत्रकार परिषदेमध्ये प्रकट झाल्यावर त्यांच्या बोलण्यावर सर्व जिल्हा वाशियांचे लक्ष केंद्रीत झाले होते. कारण मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख प्रकरणात जी कठोर भुमिका घेतली होती तशीच भुमिका ते या प्रकरणात घेतील असे जनतेला वाटत होते. परंतु विजय पवार हे त्यांचे आर्थिक हितसंबंध लक्षात घेता त्यांनी निच विजय पवार यांच्या बद्दल सर हे आदराचे शब्द वापरुन आपल्या आकलेचे तार तोडलेले आहेत असे निवेदनात म्हटले आहे.

निवेदनात शेवटी म्हटले आहे की, उमाकिरण या प्रकरणात आमदार महोदयांची जास्त बदनामी होऊ नये म्हणुन त्यांनी आरोपीस शरण येण्यास सांगितलेले असावे. या प्रकरणी सखोल चौकशी केल्यस संपुर्ण सत्य बाहेर येईल. या प्रकरणातील आरोपी व आमदार यांचे बँक पासबुक मोबाईल संवाद तपासणे गरजेचे आहे. कारण आमदार महोदय यांनी विजय पवार यांच्या मार्फत फार मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहार व जमीन खरेदी विक्रीचे व्यवहार केलेले आहेत. करीता स्थानिक आमदाराच्या दबावाला बळी न पडता निपक्ष चौकशी करुन आरोपीला कडक शासन व्हावे. पोलिस अधिक्षक यांना दिलेल्या निवेदनावर मा.नगर सेवक अशफाक इनामदार, मा. उपनगर अध्यक्ष मोईन मास्टर, फारुख पटेल, बरकत पठाण, अलीम पटेल यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## बीड प्रकरणात

घटनेचे गांभीर्य आणि संवेदनशीलता पाहता या लैंगिक अत्याचार प्रकरणाच्या तपासासाठी एसआयटी स्थापन करण्याची घोषणा केली. गुरू-शिष्याच्या प्रतिमेला बीडमधील घटनेने काळे फासण्याचे काम केले आहे. पिडित मुलीने आणि तिच्या आईने नराधम संस्थाचालक आणि शिक्षकाच्या विरोधात पोलीसात तक्रार दाखल करण्याचे धाडस दाखवले. आरोपींना अटक करून त्यांच्यावर पोस्को अंतर्गत गुन्हा नोंद झालेला आहे. परंतु या प्रकरणाची चौकशी पोलीसांकडून व्यवस्थीत सुरू नसल्याचा आरोप केला जात आहे. आरोपींना अटक होऊन पोस्कोअंतर्गत गुन्हा नोंद असताना फक्त दोन दिवसांचा पीसीआर कसा मागितला गेला? असा सवाल आमदार तुपे यांनी उपस्थितीत केला. पोलीसांच्या या भूमिकेमुळे संशयाचे वातावरण निर्माण होत आहे. आरोपींच्या मागे कोणाचा राजकीय वरदहस्त आहे का? याचा शोध घेऊन सखोल चौकशी सरकार करणार आहे का? एसआयटी नेमली जाईल का? इतर मुलींच्या बाबतीत असा काही प्रकार घडला का? याचीही चौकशी होणे गरजेचे असल्याचे मुद्दे आमदार तुपे यांनी सभागृहात मांडले. यावर सरकारची भूमिका स्पष्ट करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुरवातीलाच बीड लैंगिक अत्याचार प्रकरणाची आयपीएस महिला अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली एसआयटी समिति नेमूण चौकशी केली जाईल, अशी घोषणा केली. हिमंतीने मुलीने तिच्या आईने तक्रार दिल्याने पोस्को अंतर्गत आरोपींवर गुन्हा नोंद झाला आहे. दोन दिवसांची पीसीआर का? याची चौकशी केली जाईल. इतर मुलींसोबत असा काही प्रकार घडला का? याची चौकशी त्यांना विशासात घेऊन केली जाईल. प्रकरणाची व्याप्ती आणि संवेदनशीलता लक्षात घेऊन एसआयटी समिती स्थापन करू. महिला आयपीएस अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली ही समिती काम करेल. यामागे कोण आहेत, कोणाचा राजकीय वरदहस्त आहे का? याचीही चौकशी केली जाईल. प्रकरणाचा छडा लावून टाईमबॉन्ड पद्धतीने तपास केला जाईल. आरोपींना कठोर शिक्षा होईल, आरोपींना कोणाचा राजकीय वरदहस्त असेल तर त्याचा तपास करून त्यांनाही शिक्षा केली जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली.

## हैद्राबादचे वादग्रस्त

सोपवलं जाण्याची शक्यता आहे. पक्षातील सुत्रांनी सोमवारी याबद्दलची माहिती दिली. केंद्रीय नेतृत्त्वानं भाजप प्रदेशाध्यक्षपदासाठी राव यांच्या नेतृत्त्वाला मंजुरी दिल्याचं सांगितलं जात आहे. उच्च न्यायालयात वकील असलेले आणि विधान परिषदेचे माजी सदस्य एन. रामचंदर राव त्यांचा उमेदवारी अर्ज दाखल करतील. केंद्रीय नेतृत्त्वानं आपला कल स्पष्ट केला असल्यानं अन्य कोणता नेता मैदानात उभा राहण्याची शक्यता नाही.ठ राज्यघटनेवरून रणकंदन! 'घटना बदलण्याचा डाव,' संघनेत्याच्या विधानावर विरोधकांचा हल्लाबोल केंद्रीय राज्यमंत्री बंडी संजय आणि भाजपचे खासदार ईटाला राजेंद्र आणि अरविंद धर्मपुरी प्रदेशाध्यक्षपदाच्या शर्यतीत आघाडीवर मानले जात होते. पण भाजपच्या नेतृत्त्वानं पक्षनिष्ठ आणि वादांपासून दूर राहणाऱ्या रामचंदर राव यांच्या पारड्यात वजन टाकल्याची चर्चा आहे. राव अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, भारतीय जनता युवा मोर्चा आणि भाजपचे कायदेविषयक आघाडीत सक्रिय होते. त्यांची प्रदेशाध्यक्ष बिनविरोध वर्णी लागण्याची शक्यता आहे.

## परभणी जिल्हाचा विकास

इत्तेहादूल मुसलमिन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार असदुद्दीन ओवैसी यांनी केले. ते शहरातील दर्गा रोड परिसरात आयोजित जाहिर सभेत रविवारी (दि.२९ जून ) सायंकाळी बोलत होते.

यावेळी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष माजी खासदार इम्तियाज जलील, पक्ष निरिक्षक वसीम अहेमद, जिल्हा समन्वयक मोहम्मद गौस झैन आदींची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलतांना खासदार असदुद्दीन ओवैसी म्हणाले की, परभणी जिल्हयातील युवकांना रोजगारासाठी पुणे, हैद्राबाद यासारख्या महानगरांमध्ये जावे लागत असल्याने आपल्या पवित्र मातीचा अपमान आहे. वर्षानूवर्ष येथे सत्ता गाजवणार्या पक्षांनी यासाठी काय केले ? असा सवाल यावेळी खा असदुद्दीन ओवैसी यांनी विचारला.

एमआयएम पक्षाच्या वतीने आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या महानगर पालिका, पंचायत समिती, जिल्हा परिषद आणि नगर पालिका आदी निवडणूकांच्या पार्श्वभूमीवर पूर्वतयारी म्हणून पक्ष अध्यक्ष असदुद्दीन ओवैसी यांच्या जाहिर सभेचे आयोजन करण्यात आले होते. दरम्यान परभणी जिल्हा समन्वयक मोहम्मद गौस झैन यांनी यावेळी सांगीतले की, परभणी जिल्हयासह शहरात मागील अनेक वर्षांपासून विकासाची कामे ठप्प आहेत. नागरीकांत सत्ताधारी पक्षांविषयी रोष आहे. रस्ते, नाल्या, पाणी पुरवठा आणि इतर मुलभूत गरजांची पुर्तता देखील होत नसल्याने नागरीकांना अनेक वर्षांपासून अडचणींना सामोरे जावे लागत आहे. यावेळी प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले.या जाहीर सभेस जिल्हयासह बाहेर जिल्हयातून देखील कार्यकर्ते, नागरीकांची मोठया संख्येने उपस्थिती होती.